**वाढीव प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय**
**असलेले अतिसंवेदनशील क्षेत्र**
**स्पष्टीकरणात्मक सूचना**

**महाराष्ट्र शासन**
आदिवासी विकास विभाग,
शासन परिपत्रक क्र.आस्था-१७०१/प्र.क्र.११४/भाग-३/का.१५
मंत्रालय विस्तार, मुंबई - ३२.
दिनांक : ९ नोव्हेंबर, २००५

**वाचा** :- (१) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.टिएसपी-१०८६/८७१०/प्र.नं.३१/का.५, दिनांक ९ मार्च, १९९०
(२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.आस्था-१०९३/प्र.क्र.२०२/९३/का.१५, दिनांक ९ नोव्हेंबर, १९९३
(३) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.आस्था-१०९७/प्र.क्र.१८/का.१५, दिनांक ५ फेब्रुवारी, १९९९.
(४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.टिआरएफ-२०००/प्र.क्र.३/बारा, दिनांक ६ ऑगस्ट, २००२.

**परिपत्रक** :- आदिवासी भागात वास्तव्य करण्यास व तेथे काम करण्यास अधिकारी/कर्मचाऱ्यांनी प्रेरित व्हावे यासाठी शासनाने सर्वप्रथम दिनांक १ जानेवारी, १९८९ पासून दरमहा विशिष्ट दराने प्रोत्साहन भत्ता मंजूर करण्याची योजना सुरु केली आहे. यामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत. उपरोक्त संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णयान्वये नक्षलग्रस्त भागासाठी विशेष कृती कार्यक्रमांतर्गत कार्यक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे व विविध सवलतींचे एकत्रित आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयातील परिच्छेद-२ (ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे शासन निर्णय दि.५ फेब्रुवारी, १९९९ नुसार अनुज्ञेय असलेला प्रोत्साहन भत्ता नक्षलग्रस्त तसेच अतिसंवेदनशील म्हणून घोषित केलेल्या आदिवासी भागात मुख्यालय असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्या मूळ वेतनाच्या १५% इतका किमान रु.२००/- व कमाल रु.१५००/- दरमहा या मर्यादेत अनुज्ञेय ठरविण्यात आला आहे. नक्षलग्रस्त क्षेत्र गृह विभागाच्या शासन निर्णय क्र.एनएएक्स-२००४/प्र.क्र.४८/विशा-१ ब, दिनांक ७ डिसेंबर,२००४ अन्वये घोषित करण्यात आले आहे. मात्र अतिसंवेदनशील क्षेत्राबाबत स्पष्ट आदेश नसल्यामुळे सामान्य प्रशासन विभागाच्या दि.६.८.२००२ च्या शासन निर्णयातील परिच्छेद-२ (ब) प्रमाणे प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय ठरविण्यास अडचणी येत असल्याबाबत विविध कार्यालयांकडून विचारणा करण्यात येत आहे. सबब याबाबत पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे.

GR. NO-20051117153616001

२. राज्यात स्थापन करण्यात आलेल्या एकूण २४ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांपैकी प्रकल्प यंत्रणेचे बळकटीकरण करण्याच्या उद्देशाने व सर्व यंत्रणा एकछत्री अंमलाखाली आणण्याच्या उद्देशाने खालील ११ प्रकल्प कार्यालये संदर्भाधीन दि.९ नोव्हेंबर, १९९३ च्या शासन निर्णयान्वये अतिसंवेनदनशील म्हणून निवडण्यात आली आहेत :-

(१) जव्हार, जि.ठाणे
(२) डहाणू, जि.ठाणे
(३) नाशिक,जि. नाशिक
(४) कळवण, जि.नाशिक
(५) तळोदा, जि.नंदूरबार
(६) किनवट, जि.नांदेड
(७) धारणी, जि.अमरावती
(८) अहेरी, जि.गडचिरोली
(९) भामरागड, जि.गडचिरोली
(१०) गडचिरोली, जि.गडचिरोली
(११) पांढरकवडा, जि.यवतमाळ.

३. सदर प्रकल्प क्षेत्र वाढीव प्रोत्साहन भत्त्यासाठी अतिसंवेदनशील म्हणून ग्राहय धरण्यात यावीत. या ११ एकात्मिक आदिवासी प्रकल्प क्षेत्रातील जी गांवे/ शहरे संदर्भाधीन दि.९ मार्च, १९९० च्या शासन निर्णयान्वये घोषित केलेल्या आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये समाविष्ट आहेत त्या गावात/शहरात प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या व मुख्यालय असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्या मूळ वेतनाच्या १५% इतका किमान रु.२००/- व कमाल रु.१५००/- दरमहा या मर्यादेत प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय राहील. सर्वसाधारण आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना संदर्भाधीन दि.५ फेब्रुवारी, १९९९ च्या शासन निर्णयानुसार अनुज्ञेय असलेला प्रोत्साहन भत्ता लागू राहील.

४. शासनाच्या सर्व विभागांनी वरील परिच्छेद-३ प्रमाणे अतिसंवेदनशील क्षेत्रात कार्यरत असलेल्या व यापूर्वी अनुज्ञेय ठरविलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत कार्यवाही करावी.

५. हे शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभागाच्या व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१२४२/१२, दिनांक १४.१०.२००५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( दु. र. चंद्रिकापुरे )
**अवर सचिव**

**प्रति,**
राज्यपालांचे सचिव,

मुख्यमंत्र्यांचे सचिव,
मंत्री/राज्यमंत्री, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक
सचिव, आदिवासी विकास यांचे स्वीय सहाय्यक
सर्व सह सचिव /उप सचिव, आदिवासी विकास यांचे स्वीय सहाय्यक
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय ( कार्यासन-१२) मुंबई
मंत्रालयीन सर्व विभाग
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
सर्व विभागीय आयुक्त
मंत्रालयीन सर्व विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील विभाग प्रमुख
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
*प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
*अध्यक्ष, वैधानिक विकास महामंडळ, मराठवाडा/विदर्भ/कोकण व उर्वरित महाराष्ट्र
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
महालेखापाल, (लेखापरीक्षा), महाराष्ट्र -१ /२, मुंबई/नागपूर
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
मुख्य लेखापरिक्षक, स्थानिक निधी हिशोब, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती
सर्व जिल्हाधिकारी
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्तीय अधिकारी
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्चमाध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
*अतिरिक्त सरकारी अभियोक्ता,(मुळ शाखा)/(अपीलेट शाखा), उच्च न्यायालय, मुंबई
*सरकारी अभियोक्ता,मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ, नागपूर/औरंगाबाद.
*मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई / नागपूर/औरंगाबाद
संचालक, तांत्रिक प्रशिक्षण, द्वारा तंत्रशिक्षण संचालक, मुंबई
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व विभागीय तंत्रशिक्षण उपसंचालक,

सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी,
संचालक, समाज कल्याण,महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/अमरावती/नागपूर
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
अधिक्षक, वेतन पथक, सर्व जिल्हे
सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखापरिक्षक (शिक्षण विभाग)
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई (या शासन निर्णयास पुरेशी प्रसिध्दी देण्याबाबत)
आदिवासी विकास विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती (का.१५), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.

* पत्राव्दारे